


# सामना जिंकला इंग्लंडने; मने जिंकली नेपाळने

## बलाढ्य इंग्लंडकडून नेपाळ अवघ्या ४ धावांनी पराभूत : लढाऊ वृत्ती ठरली कौतुकास्पद

**मुंबई** : टी-२० विश्वचषक २०२६ च्या गट टप्प्यातील थरारक सामन्यात नेपाळने बलाढ्य इंग्लंडला जोरदार टक्कर देत क्रिकेटप्रेमींची मने जिंकली. १८५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना नेपाळने निर्धारित २० षटकांत ६ बाद १८० धावा केल्या. विजय अवघ्या चार धावांनी हुकला असला, तरी नेपाळचा लढाऊ खेळ सर्वांच्या लक्षात राहिला.

डावाची सुरुवात कुशल भुर्तेलने आक्रमक शैलीत केली. त्याने १७ चेंडूत ४ चौकार व १ षटकाराच्या मदतीने २९ धावा करत संघाला वेगवान सुरुवात करून दिली. मात्र आसिफ शेख लवकर बाद झाला. कर्णधार रोहित पौडेलने संयमी खेळी करत डाव सावरला. त्याने ३४ चेंडूत ३९ धावा करत डाव पुढे नेला. दुसऱ्या टोकाला दिपेंद्रसिंह ऐरींने अत्यंत प्रभावी फलंदाजी करत इंग्लंडच्या गोलंदाजांवर दबाव आणला. ऐरींने २९ चेंडूत ६ चौकार व १ षटकारासह ४४ धावांची खेळी केली.

मधल्या षटकांत नेपाळचा रनरेट टिकून राहिला. रोहित पौडेल आणि दिपेंद्र ऐरी यांची भागीदारी निर्णायक ठरेल असे वाटत असतानाच दोघेही पाठोपाठ बाद झाले. त्यामुळे सामना पुन्हा इंग्लंडच्या बाजूने झुकला. मात्र लोकश बामने शेवटच्या षटकांमध्ये धडाकेबाज फलंदाजी करत नेपाळच्या आशा जिवंत ठेवल्या. बामने अवघ्या २० चेंडूत ४ चौकार व २ षटकारांच्या सहाय्याने नाबाद ३९ धावा केल्या.

इंग्लंडकडून लियाम डॉसनने अचूक गोलंदाजी करत ४ षटकांत केवळ २१ धावा देत २ विकेट्स घेतल्या. सॅम करन, जॉफ्रा आर्चर आणि ल्यूक वूड यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. अखेरच्या षटकांत आवश्यक धावा जास्त असल्याने नेपाळला विजयापर्यंत पोहोचता आले नाही.



झुंजार खेळीनंतर नेपाळ पराभूत झाला त्यावेळेस हताश लोकेश बम.

टी२० वर्ल्ड कप २०२६ मधील गट क' मधील पाचव्या सामन्यात मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर इंग्लंड आणि नेपाळ यांच्यात रंगतदार सामना सुरू असून नेपाळने विजयाच्या दिशेने धाडसी वाटचाल सुरू ठेवली आहे. इंग्लंडने उभारलेल्या १८५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नेपाळला १५.१ षटकांनंतर ३ विकेट्सच्या मोबदल्यात १२६ धावा करता आल्या असून विजयासाठी अजून २९ चेंडूंमध्ये ५९ धावांची गरज आहे.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या इंग्लंडने २० षटकांत ७ विकेट्स गमावत १८४ धावा केल्या. जेकब बेथेल आणि कर्णधार हॅरी ब्रूक यांनी इंग्लंडच्या डावाचा डोलारा सांभाळला. बेथेलने ३५ चेंडूत ५५ धावांची संयमी खेळी केली, तर ब्रूकने ३२ चेंडूत ५३ धावांची आक्रमक खेळी साकारली. अखेरीस विल जॅक्सने अवघ्या १८ चेंडूत ३९ धावा करत इंग्लंडला मजबूत धावसंख्या उभारून दिली.

नेपाळकडून गोलंदाजीत दीपेंद्रसिंह ऐरी आणि नंदन यादव यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेत प्रभावी मारा केला. संदीप लामिछानेने किफायतशीर गोलंदाजी करत एक महत्त्वाचा गडी बाद केला, तर युवा फिरकीपटू शेर मल्लानेही एक विकेट मिळवली.

लक्ष्याचा पाठलाग करताना नेपाळने आत्मविश्वासपूर्ण सुरुवात केली. मधल्या षटकांत संघाने संयम राखत धावगती कायम ठेवली. सध्या नेपाळचा धावगती दर ८.३० असून आवश्यक धावगती १२.२० इतकी आहे.

पराभव असूनही नेपाळने दाखवलेला आत्मविश्वास, लढाऊ वृत्ती आणि दर्जेदार खेळ कौतुकास्पद ठरला. हा सामना नेपाळ क्रिकेटच्या प्रगतीचा ठळक दाखला ठरला असून, भविष्यातील सामन्यांसाठी संघाला निश्चितच प्रेरणादायी ठरेल.




सॅम कुरनने शेवटच्या षटकात अचूक गोलंदाजी करत सामना इंग्लंडच्या बाजूने फिरवला.

पान १ वरुन

## बलाढ्य नेते, बेडगी कार्यकर्ते, बेरकी मतदाते

### अघोरी ज़ादूटोण्याच्या घटना; मतदारांमध्ये पसरलेली भिती

सोलापूर जिल्ह्यात पहिल्यांदाच निवडणुकीदरम्यान जादूटोण्याच्या घटना समोर आल्या. पेनूरला शिंदेसेनेचे उमेदवार चरण चवरे यांच्या घरासमोर जादूटोणा केल्याचा प्रकार उघडकीस आला. अघोरी जादूटोण्याचा त्यांच्या निवडणुकीवर किती परिणाम झाला, याकडं मोहोळ तालुक्याचं लक्ष आहे. निवडणुकीच्या निकालातून याचं उत्तर मिळेल. दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव तांडा इथं तर मतपेटीच्या खालीच जादूटोण्याचं साहित्य ठेवण्यात आलं. मात्र कोणत्या उमेदवाराच्या पराभवासाठी जादूटोण्याचा प्रयोग करण्यात आला, हे समजलं नाही. तथापि, पेनूर आणि मुळेगाव तांडा या ठिकाणी झालेल्या जादूटोण्याच्या घटनांमधून 'त्या' 'त्या' ठिकाणी पर्यायानं तालुक्यांमध्ये खळबळ माजली होती. इथल्या मतदारांमध्ये भितीचं वातावरण पसरलं होतं.

### स्व.अजितदादांच्या निधनाचं दुखवटा; प्रचारासाठी मिळालेले कमी दिवस

स्व. अजित पवारांच्या विमान अपघाती निधनामुळं पाळण्यात आलेल्या दुखवट्याच्या काळात तीन-चार दिवस ऐन निवडणुकीत गती आलेला प्रचार थांबलेला होता. दुखवटा संपल्यानंतर जाहीर प्रचारासाठी अवघे ५-६ दिवस राहिले. या काळात जिल्हा परिषद गटातील समाविष्ठ गावांमधील मतदारांपर्यंत प्रचार पोचवताना सर्वच पक्षांच्या उमदेवारांची अक्षरश: दमछाक झाली. प्रचारासाठी वेळ अत्यंत कमी मिळाला, असे सर्वच पक्षाचे नेते, पुढारी आणि सर्वसामन्य कार्यकर्ते तसेच उमेदवारांनी सांगितले.

### पाटील आणि भालके एकत्र; विजयाचे उमटणार का भगिरथ' प्रयत्न

अत्यंत अनपेक्षित अशी पंढरपूर तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक झाली. निवडणुकीच्या महत्त्वाच्या निर्णायक टप्प्यावर आमदार अभिजित पाटील आणि भगिरथ भालके यांनी युती करत विरोधी भाजप गटाला टक्कर दिली. कल्याण काळे, ॲड. गणेश देशमुख यांच्यासह अनेकांनी भाजपमध्ये प्रवेश केला. विठ्ठल परिवार दूंभगला गेला होता. या परिवारातील नेतेमंडळींनी एकमेकांचे प्रचार सभांमध्ये वस्त्रहरण केलं. वैयक्तिक टिकेतून प्रचाराची राळ उडवली. पालकमंत्री जयकुमार गोरेंनी या तालुक्याची निवडणुक हातात घेत भाजप उमेदवारांच्या विजयासाठी ताकद लावली. मात्र पंढरपूर तालुक्यातील जनतेनं कोणाच्या बाजूनं कौल दिला? याच उत्तर आजच दुपारपर्यंत मिळणार आहे.

### वेळापूरमधील मतदान... 'तो' राडा अन् खासदार-आमदाराचं आंदोलन

वेळापूरमधील मतदान केंद्रावर स्वत:च्या आईला मतदानासाठी घेऊन जात असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यास पोलिस अधिकाऱ्याने मारहाण केल्याच्या निषेधार्थ, वेळापुरात पोलीस ठाण्यात मोठा राडा झाला. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील आणि आमदार उत्तम जानकर यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांनी पोलीस ठाण्याच्या पायऱ्यांवर कित्येक तास बसून आंदोलन केलं.

## न्यूझीलंडचा अफगणिस्तानवर ५ गडी राखून विजय

**चेन्नई** : टी-२० वर्ल्ड कप २०२६ मधील गट ड मधील चौथ्या सामन्यात न्यूझीलंडने अफगाणिस्तानवर पाच विकेट्सनी शानदार विजय मिळवला. चेन्नई येथे ८ फेब्रुवारी रोजी झालेल्या या सामन्यात अफगाणिस्तानने उभारलेल्या १८३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग न्यूझीलंडने १७.५ षटकांत पूर्ण करत १३ चेंडू राखून सामना आपल्या नावावर केला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या अफगाणिस्तान संघाने २० षटकांत ६ विकेट्स गमावत १८२ धावा केल्या. गुलबदीन नायबने अफगाणिस्तानच्या डावाचा कणा सांभाळत ३५ चेंडूत ६३ धावांची आक्रमक खेळी साकारली. या खेळीत त्याने तीन चौकार आणि चार षटकार लगावले. त्याला सदीकुल्ला अतलने २४ चेंडूत २९ धावांची साथ दिली. रहमानुल्ला गुरबाजने २७, तर दरविश रसूलीने २० धावा केल्या. न्यूझीलंडकडून लॉकी फर्ग्युसनने प्रभावी मारा करत दोन विकेट्स घेतल्या, तर मॅट हेन्री आणि जेकब डफी यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

१८३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडच्या फलंदाजांनी संयमी व आक्रमक खेळाचा सुरेख संगम दाखवला. सुरुवातीच्या काही विकेट्स गेल्यानंतरही न्यूझीलंडने धावगती कायम राखली. मधल्या फळीतल्या फलंदाजांनी जबाबदारीने खेळ करत संघाला विजयाच्या दिशेने नेले. अखेर १७.५ षटकांत न्यूझीलंडने ५ विकेट्स गमावत लक्ष्य गाठले आणि सामना पाच विकेट्सनी जिंकला.

या विजयासह न्यूझीलंडने गटातील गुणतालिकेत आपले स्थान मजबूत केले असून अफगाणिस्तानला मात्र या पराभवामुळे धक्का बसला आहे. सामन्यातील चुरशीच्या खेळीमुळे प्रेक्षकांना शेवटपर्यंत थरार अनुभवायला मिळाला.

टी-२० वर्ल्ड कप २०२६ मधील गट ड सामन्यात न्यूझीलंडने अफगाणिस्तानने दिलेले १८३ धावांचे आव्हान यशस्वीपणे पेलत दमदार विजय नोंदवला. चेन्नई येथे झालेल्या या सामन्यात न्यूझीलंडने १७.५ षटकांत ५ विकेट्स गमावत १८३ धावा करत सामना पाच विकेट्सनी जिंकला.

लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडला सुरुवातीला दुहेरी धक्का बसला. सलामीवीर फिन ॲलन अवघ्या एका धावेत बाद झाला, तर रचिन रवींद्र शून्यावर माघारी परतला. मात्र त्यानंतर टिम सायफर्टने एक बाजू सांभाळत आक्रमक फलंदाजी केली. सायफर्टने ४२ चेंडूत ७ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ६५ धावांची जबरदस्त खेळी साकारली. त्याला ग्लेन फिलिप्सने उत्तम साथ देत २५ चेंडूत ४२ धावा केल्या.

मधल्या फळीत मार्क चॅपमनने १७ चेंडूत २८ धावा करत धावगती कायम राखली. अखेरीस डॅरिल मिचेल आणि कर्णधार मिचेल सॅन्टनर यांनी शांतपणे डाव सावरत संघाला विजयाच्या दिशेने नेले. मिचेलने १४ चेंडूत २५ धावा करत नाबाद राहिला, तर सॅन्टनरने अवघ्या ८ चेंडूत १७ धावांची झंझावाती खेळी करत सामना संपवला.

अफगाणिस्तानकडून मुझीब उर रहमानने प्रभावी गोलंदाजी करत दोन विकेट्स घेतल्या. राशिद खान आणि मोहम्मद नबी यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला, तर अझमतुल्ला ओमरझाईने एक विकेट मिळवली. मात्र अफगाण गोलंदाज न्यूझीलंडच्या धावगतीवर लगाम घालण्यात अपयशी ठरले.

या विजयासह न्यूझीलंडने गट ड मधील आपली दावेदारी भक्कम केली असून स्पर्धेतील आव्हान अधिक तीव्र झाले आहे.




गुलबदीन नईबने ३५ चेंडूत ६३ धावांची खेळी केली.

## जसप्रीत बुमराहनंतर अभिषेक शर्मा आजारी



**मुंबई** : टी-२० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेला सुरुवात झाली असून यंदा भारत यजमानपद भूषवत आहे. गतविजेता म्हणून भारतीय संघ मैदानात उतरला असून पुन्हा एकदा विजेतेपदाचा प्रमुख दावेदार मानला जात आहे. मात्र स्पर्धेच्या सुरुवातीलाच भारतीय संघाला खेळाडूंच्या फिटनेसच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. कोणाला दुखापत, तर कोणाला आजारपण अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. हर्षित राणा, वॉशिंग्टन सुंदर आणि जसप्रीत बुमराहनंतर आता युवा सलामीवीर अभिषेक शर्माच्याही नावाची या यादीत भर पडली आहे.

शनिवार, ७ फेब्रुवारी रोजी भारतीय संघाने टी२० वर्ल्ड कपमधील पहिला सामना अमेरिकेविरुद्ध खेळत आपल्या मोहिमेची सुरुवात केली. या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करत १६१ धावा केल्या. मात्र अमेरिकेच्या डावादरम्यान अचानक अभिषेक शर्माची तब्येत बिघडली. सुरुवातीला तो मैदानावर उपस्थित होता, मात्र काही वेळातच त्याला मैदान सोडावे लागले. त्यानंतर तो डगआउटमध्येही इतर खेळाडूंसोबत दिसून आला नाही, त्यामुळे प्रेक्षकांमध्ये आणि क्रिकेट वर्तुळात संभ्रम निर्माण झाला.

सामना संपल्यानंतर या घटनेचा खुलासा झाला. सादरीकरणावेळी कर्णधार सूर्यकुमार यादव यांनी अभिषेकला कोणतीही दुखापत नसून तो आजारी पडल्यामुळे मैदानाबाहेर गेल्याचे सांगितले. त्यांनी हेही स्पष्ट केले की जसप्रीत बुमराहला सामन्यापूर्वी तीव्र ताप आला होता, तर अभिषेकलाही अस्वस्थ वाटू लागले होते. दरम्यान, मोहम्मद सिराजने सांगितले की अभिषेकला अचानक पोटदुखी सुरू झाल्याने खबरदारी म्हणून त्याला पुन्हा क्षेत्ररक्षणासाठी उतरवण्यात आले नाही. त्याच्या जागी सबस्टिट्यूट फील्डर म्हणून संजू सॅमसन मैदानात उतरला.

दरम्यान, अभिषेकची प्रकृती आता सुधारत असून तो पुढील सामन्यासाठी पूर्णपणे तंदुरुस्त राहील, अशी माहिती देण्यात आली आहे. अमेरिकेविरुद्धचा सामना त्याच्यासाठी निराशाजनक ठरला होता, कारण तो एकही धाव न काढता बाद झाला. हा त्याचा वरिष्ठ आयसीसी स्पर्धेतील पहिलाच सामना होता. आता १२ फेब्रुवारी रोजी नामीबियाविरुद्ध होणाऱ्या सामन्यात दमदार कामगिरी करत तो ही कमतरता भरून काढण्यास उत्सुक असेल.

## सलग आठ विजयासह भारताने ऑस्ट्रेलियाला टाकले मागे

**टी-२० वर्ल्ड कप २०२६ : भारताचा विजयी शुभारंभ, जागतिक विक्रमाला गवसणी**

**मुंबई** : टी२० वर्ल्ड कप २०२६ मधील पहिल्याच सामन्यात भारतीय संघाने अमेरिकेवर २९ धावांनी मात करत विजयी सलामी दिली. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या लढतीत विजयासोबतच भारताने टी२० वर्ल्ड कप इतिहासात एक नवा जागतिक विक्रमही प्रस्थापित केला. मागील टी२० वर्ल्ड कपमध्ये भारताने सलग आठ सामने जिंकत विजेतेपद पटकावले होते. या स्पर्धेतील पहिल्या सामन्यात अमेरिकेला पराभूत करत भारतीय संघाने टी२० वर्ल्ड कपमध्ये सलग नवव्या विजयाची नोंद केली. त्यामुळे दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया (सलग ८ विजय) यांना मागे टाकत भारत या यादीत अव्वल स्थानी पोहोचला आहे.

या सामन्यात भारताची सुरुवात मात्र अत्यंत खराब झाली होती. अवघ्या ७७ धावांत सहा विकेट्स बाद झाल्याने संघ अडचणीत सापडला होता. मात्र कर्णधार सूर्यकुमार यादवने जबाबदारी स्वीकारत ८४ धावांची नाबाद खेळी साकारली. त्यांच्या संयमी व आक्रमक फलंदाजीच्या जोरावर भारताने २० षटकांत १६१ धावांपर्यंत मजल मारली.

गोलंदाजांनीही आपली भूमिका चोख बजावत अमेरिकेला १३२ धावांत रोखले आणि भारताचा २९ धावांनी विजय निश्चित केला. सूर्यकुमार यादव वगळता कोणताही भारतीय फलंदाज ३० धावांचा टप्पा ओलांडू शकला नाही, ही बाब संघासाठी चिंतेची ठरू शकते. स्पर्धेतील सर्वात मजबूत मानल्या जाणाऱ्या भारतीय फलंदाजी क्रमाला पहिल्याच सामन्यात झटका बसलेला दिसून आला. तरीही विजय, विक्रम आणि आत्मविश्वास या तिन्ही बाबतीत भारताने स्पर्धेची सुरुवात दमदार केली आहे.

## नेपाळच्या शेर मल्लासाठी इंग्लंड विरुध्दचा सामना ठरला संस्मरणीय

**मुंबई** : टी-२० वर्ल्ड कप २०२६ मधील थरारक लढतींच्या मालिकेत पाचवा सामना वानखेडे स्टेडियमवर इंग्लंड आणि नेपाळ यांच्यात खेळवण्यात आला. नेपाळच्या युवा फिरकीपटू शेर मल्ला याच्यासाठी अत्यंत संस्मरणीय ठरला. या सामन्यात शेर मल्लाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करताना पहिल्याच चेंडूवर आपली छाप उमटवली.